जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया यांच्या सन २०२३- २०२४, २०२४ – २०२५ व २०२५–२०२६ या तीन वर्षाच्या कालावधीकरीता गोंदिया जिल्हयातील गोंदिया तालुक्यातील किन्ही, महालगांव -१, महालगांव -२, मुरदाडा (सायटोला), मुरदाडा (पार्वतीघाट), डांगुर्ली, देवरी, तेढवा, बनाथर, सतोना (गावघाट), बिरसोला, जिरुटोला, पुजारीटोला (कासा), तिरोडा तालुक्यातील अर्जुनी, सावरा, चांदोरी बुज, बिरोली, मांडवी, कवलेवाडा, घाटकुरोडा -१, घाटकुरोडा -२, बोंडराणी, आमगांव तालुक्यातील घाट्टेमणी (डोगाघाट), मानेकसा, सडक/अर्जुनी तालुक्यातील सांवगी – १, सांवगी – २, पळसगाव (राका), सौंदड, पिपरी, कोदामेढी, घाटबोरी तेली व अर्जुनी/मोरगांव तालुक्यातील सिंघमऱ्हान, वडेगांव (बंध्या) रेती उत्खननाकरीता ३३ रेतीघांटास आवश्यक पर्यावरण विषयक अनुमतीकरीता जाहीर लोकसुनावणीचे दि. २३/०१/२०२४. वेळ दुपारी १.०० वाजता चे इतिवृत्त.

*******

केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाच्या अधिसूचना दि. 14.09.2006 व सुधारीत अधिसूचना दि. 01.12.2009 तरतूदीनुसार जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया यांच्या सन २०२३- २०२४, २०२४ – २०२५ व २०२५–२०२६ या तीन वर्षाच्या कालावधीकरीता गोंदिया जिल्हयातील गोंदिया तालुक्यातील किन्ही, महालगांव -१, महालगांव -२, मुरदाडा (सायटोला), मुरदाडा (पार्वतीघाट), डांगुर्ली, देवरी, तेढवा, बनाथर, सतोना (गावघाट), बिरसोला, जिरुटोला, पुजारीटोला (कासा), तिरोडा तालुक्यातील अर्जुनी, सावरा, चांदोरी बुज, बिरोली, मांडवी, कवलेवाडा, घाटकुरोडा -१, घाटकुरोडा -२, बोंडराणी, आमगांव तालुक्यातील घाट्टेमणी (डोगाघाट), मानेकसा, सडक/अर्जुनी तालुक्यातील सांवगी – १, सांवगी – २, पळसगाव (राका), सौंदड, पिपरी, कोदामेढी, घाटबोरी तेली व अर्जुनी/मोरगांव तालुक्यातील सिंघमऱ्हान, वडेगांव (बंध्या) रेती उत्खननाकरीता प्रस्तावित ३३ रेतीघांटास आवश्यक पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दि. २३/०१/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजता, जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया, येथे मा. श्री. चिन्मय गोतमारे (भा.प्र.से), जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी, गोंदिया यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्रीमती. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीचे सदस्य उपस्थित होते व श्री. किशोर पुसदकर, उप-प्रादेशिक अधिकारी, भंडारा यांनी समन्वयक म्हणून काम केले. सदर जनसुनावणीस श्री. सचिन वाढवे, जिल्हा खनिकर्म अधिकारी उपस्थित होते. अध्यक्षांच्या संमतीने दुपारी 1.00 वाजता पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांची यादी सोबत जोडलेली आहे. **(सहपत्र-1).**

**<u>पार्श्वभूमी</u>**

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांनी गोंदिया जिल्हयातील सन २०२३- २०२४, २०२४ – २०२५ व २०२५–२०२६ या तीन वर्षाकरीता प्रस्तावित ३३ वाळु रेती घाटांना पर्यावरण अनुमतिसाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी मंडळास पत्र दि. २६/१०/२०२३ अन्वये अर्ज सादर केला होता. मंडळाचे मुख्यालयाने पत्र क्रं. MPCB/JD/(WPC)/Env-PH/B-231120-FTS-0247 dtd.20/11/2023 अन्वये जनसुनावणी प्रक्रिया सुरु करण्याबाबत निर्देश प्रदान केले होते.

**<u>प्रयोजन व कार्यपध्दती</u>**

उप-प्रादेशिक अधिकारी, भंडारा तथा संयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली, व जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही, असे स्पष्ट केले. या जाहीर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप लेखी अथवा तोंडी सादर करावयाचे आहेत, त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, भंडारा यांनी भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचना दिनांक 14 सप्टेंबर, 2006 नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक २२/१२/२०२३ ला दैनिक द हितवाद (इंग्रजी) व दैनिक लोकमत (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना तिस दिवसांच्या मुदतीसह प्रसिध्द करण्यात आली असल्याचे सांगितले. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-2).**

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या, पर्यावरण आघात मुल्यनिर्धारण अहवालाच्या संक्षिप्त विवरणाची प्रत व इतर माहिती असलेले कागदपत्रे (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. मंडळाचा आदेश क्र. BO/JD(WPC)/PH/B-231227-FTS-0123 date. 27/12/2023 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडलेली आहे. **(सहपत्र-3).** सुनावणी पुर्वी तसेच सुनावणी दरम्यान एकही लेखी निवेदने प्राप्त झाले नाही.

सदर प्रकल्पाबांबत प्रकल्प धांरकानी सादर केलेली कार्यकारी सारांश इंग्रजी आणि मराठीत सॉफ्ट कॉपीसह खालील कार्यालयात लोकांच्या माहितीसाठी आणि अभ्यासासाठी ठेवण्यात आले होता व याबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आले होते.

१. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. जिल्हाधिकारी, गोंदिया.
३. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया.
४. मा. व्यवस्थापक, जिल्हा उदयोग केंद्र, गोंदिया.
५. उप-विभागीय अधिकारी, गोंदिया, जि. गोंदिया.
६. उप-विभागीय अधिकारी, तिरोडा, जि. गोंदिया.
७. उप-विभागीय अधिकारी, देवरी, जि. गोंदिया.
८. उप-विभागीय अधिकारी, अर्जुनी मोरगांव, जि. गोंदिया.
९. तहसिलदार, तहसिल कार्यालय गोंदिया, जि. गोंदिया.
१०. तहसिलदार, तहसिल कार्यालय तिरोडा, जि. गोंदिया.
११. तहसिलदार, तहसिल कार्यालय आमगांव, जि. गोंदिया.
१२. तहसिलदार, तहसिल कार्यालय सडक/अर्जुनी, जि. गोंदिया.
१३. तहसिलदार, तहसिल कार्यालय अर्जुनी/मोरगांव, जि. गोंदिया.
१४. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, 5 वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
१५. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तात्या टोपे वार्ड, सिटी पेट्रोलपंम्प जवळ, मीस्कीन टँक, महाल रोड, भंडारा.
१६. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, 3 रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.8, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-22.
१७. क्षेत्रिय कार्यालय (पश्चिम मध्य क्षेत्र), पर्यावरण, वने व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भू-तल, पुर्व खंड, नवीन सचिवालय भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर-01.
१८. ग्रामपंचायत कार्यालय, किन्ही, ता. गोंदिया, जि. गोंदिया.
१९. ग्रामपंचायत कार्यालय, महालगांव, ता. गोंदिया, जि. गोंदिया.
२०. ग्रामपंचायत कार्यालय, मुरदाडा, ता. गोंदिया, जि. गोंदिया.
२१. ग्रामपंचायत कार्यालय, डांगुर्ली , ता. गोंदिया, जि. गोंदिया.
२२. ग्रामपंचायत कार्यालय, देवरी , ता. गोंदिया, जि. गोंदिया.
२३. ग्रामपंचायत कार्यालय, तेढवा , ता. गोंदिया, जि. गोंदिया.
२४. ग्रामपंचायत कार्यालय, सतोना, ता. गोंदिया, जि. गोंदिया.

२५. ग्रामपंचायत कार्यालय, बिरसोला , ता. गोंदिया, जि. गोंदिया.
२६. ग्रामपंचायत कार्यालय, जिरुटोला , ता. गोंदिया, जि. गोंदिया.
२७. ग्रामपंचायत कार्यालय, बनाथर, ता. गोंदिया, जि. गोंदिया.
२८. ग्रामपंचायत कार्यालय, पुजारीटोला (कासा) , ता. गोंदिया, जि. गोंदिया.
२९. ग्रामपंचायत कार्यालय, अर्जुनी , ता. तिरोडा, जि. गोंदिया.
३०. ग्रामपंचायत कार्यालय, चांदोरी बुज , ता. तिरोडा, जि. गोंदिया.
३१. ग्रामपंचायत कार्यालय, बिरोली , ता. तिरोडा, जि. गोंदिया.
३२. ग्रामपंचायत कार्यालय, मांडवी , ता. तिरोडा, जि. गोंदिया.
३३. ग्रामपंचायत कार्यालय, कवलेवाडा , ता. तिरोडा, जि. गोंदिया.
३४. ग्रामपंचायत कार्यालय, घाटकुरोडा , ता. तिरोडा, जि. गोंदिया.
३५. ग्रामपंचायत कार्यालय, बोंडराणी, ता. तिरोडा, जि. गोंदिया.
३६. ग्रामपंचायत कार्यालय, घाटटेमणी, ता. आमगांव, जि. गोंदिया.
३७. ग्रामपंचायत कार्यालय, टेकरी, ता. आमगांव, जि. गोंदिया.
३८. ग्रामपंचायत कार्यालय, सावंगी , ता. सडक/अर्जूनी, जि. गोंदिया.
३९. ग्रामपंचायत कार्यालय, पळसगांव (राका), ता. सडक/अर्जूनी, जि. गोंदिया.
४०. ग्रामपंचायत कार्यालय, सौंदड, ता. सडक/अर्जूनी, जि. गोंदिया.
४१. ग्रामपंचायत कार्यालय, कोदामेडी, ता. सडक/अर्जूनी, जि. गोंदिया.
४२. ग्रामपंचायत कार्यालय, घाटबोरी तेली, ता. सडक/अर्जूनी, जि. गोंदिया.
४३. ग्रामपंचायत कार्यालय, बोरी, ता. अर्जूनी /मोरगांव, जि. गोंदिया.
४४. ग्रामपंचायत कार्यालय, वडेगांव (बंध्या), ता. अर्जूनी /मोरगांव, जि. गोंदिया.
४५. ग्रामपंचायत कार्यालय, राका, ता. सडक/अर्जूनी, जि. गोंदिया.

तसेच कार्यकारी सारांश मंडळांचे संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, भंडारा तथा समन्वयक यांनी जिल्हा खनिकर्म अधिकारी गोंदिया यांना सदर प्रस्तावित रेतीघांटाबाबत व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकांचे तांत्रीक सल्लागार यांनी तपशिलवार मराठी मध्ये गोंदिया जिल्हयातील सन २०२३- २०२४, २०२४ – २०२५ व २०२५–२०२६ या वर्षाकरीता प्रस्तावित ३३ वाळु रेती घाटांना पर्यावरण विषयक बाबींबाबत प्रस्तावित रेती घांटाची माहीती, खाणकाम पध्दत, पर्यावरण व्यवस्थापन योजना, व्यावसायीक आरोग्य आणि सुरक्षा व्यवस्थापन, हरित पट्टा विकास योजना, प्रकल्पाचे फायदे, पर्यावरण व्यवस्थापन योजना- खर्च, इत्यादीबाबत सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, भंडारा यांनी उपस्थित जनसमुदायाला, सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्याचे त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, किंवा लेखी सादर करावे असे आवाहन केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

| अ. क्र. | नाव | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | मा. जिल्हाधिकारी, गोंदिया. | - | सदर सादरीकरणाव्दारे आपणांस लक्षात येईल की, रेती निर्गती व लिलावाबाबत ग्रामसभेचा ठराव व होकार प्राप्त झालेला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्री. रोहीत तिवारी, गोंदिया | मुरदाडा (पार्वती) घाटातील रेती वाहतूकीचा रस्ता गांवातून जात असल्याने धुळीचा त्रास होतो. | मुरदाडा (पार्वती) या गांवातील रस्त्याचे दुरुस्तीचा प्रस्ताव असून जिल्हा खनिज निधी मधून सदर काम करण्यात येईल. रेती वाहतुकीमुळे प्रभावित क्षेत्रांना प्राधान्य देण्यात येईल याबाबतचे अंदाजपत्रके करण्याचे काम झालेले आहे, जसे निधी उपलब्ध होईल तसे त्या प्रस्तावांवर खर्च केले जाईल. पर्यावरण अनुमती रेती घांटासाठी तिन वर्षाकरीता घेण्यात येत आहे तथापि रेतीघांटाचा सर्वे व निविदा प्रत्येक वर्षाकरीता करण्यात येईल. |
| ३ | श्री. अमित शहा, गोंदिया | विरसोला, सायटोला, डांगुर्ली या ग्रामपंचायत व जनतेमध्ये रेती वाहतुकीच्या रस्त्यामुळे नेहमी संघर्षाची स्थिती राहत असून यामध्ये प्रशासनाची काय मदत होईल. | जिल्हा खनिज निधी वापरामध्ये रेती वाहतुकींचा रस्त्यांना प्राधान्य देण्यात आले आहे. नियमांनुसार त्यावर काम केले जाईल. संबंधित विभांगाना रस्त्यांचे दुरुस्ती/बांधकामाविषयी अंदाज-पत्रक करण्याविषयी सुचना देण्यात आलेल्या आहेत, निधी प्राप्त होताच या कामावर खर्च करण्यात येईल. |
| ४ | प्रादेशिक अधिकारी | स्टॉक यार्ड विषयी काहीच माहिती दिलेली नाही. पाणी शिंपडा फक्त एक कि.मी पर्यत करण्यात येईल असे सादरीकरणामध्ये सांगण्यात आले असुन एक किमीवरच्या रस्त्यावंर पाणी शिंपडण्याबाबतची माहिती दयावी. | रेती स्टॉक यार्ड ठेवण्यात आलेले आहे. ज्या रेती घाट व स्टॉक यार्ड मधील अंतर एक किमी पेक्षा जास्त असले तरी संपूर्ण रस्त्यावर पाणी शिंपडण्यात येईल.<br><br>जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी सांगितले की गोंदिया जिल्हयामध्ये रेती साठविण्यासाठी शासकिय जागा उपलब्ध नसुन खाजगी जागा आहे.<br><br>रेतीघाट व रेती साठविण्याच्या जागेतील आदर्श अंतर एक किमी आहे परंतु ज्या ठिकाणी अंतर जास्त असेल तर त्या ठिकाणी संपूर्ण रस्त्यावर धूळ नियंत्रणासाठी पाणी शिंपडण्यात येईल. स्टॉक यार्ड मध्ये रेती वाहतूक व हाताळणीमुळे हवा प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक सुचना टेंडर नोटीस मध्ये घालण्यात येईल. |

जनसुनावणी दरम्यान एकही लेखी आक्षेप/ सुचना प्राप्त झली नाही.

**मा. अध्यक्ष लोकसुनावणी समिती**

आजच्या जनसुनावणीमध्ये प्राप्त सुचनांची इतिवृत्तामध्ये नोंद घेण्यात आलेली आहे. त्यावर जिल्हा खनिकर्म अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील. जिल्हा खनिज निधीच्या वापरांसबंधी उपस्थित मुद्दयांचा विचार केला जाईल.

आभार व्यक्त करुन जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आली.

**(किशोर पुसदकर)**
**उप-प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि.मंडळ, भंडारा व**
**समन्वयक, लोक सुनावणी समिती**

**(हेमा देशपांडे)**
**प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि.मंडळ, नागपूर व**
**सदस्य, लोक सुनावणी समिती**

**(चिन्मय गोतमारे)**(भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी व**
**अध्यक्ष, लोक सुनावणी समिती**